|| श्री ||

# प्रवासाविषयी

■ ■ ■

सर्व शास्त्रांचे अधिष्ठान अध्यात्मशास्त्र आहे. हे शास्त्र यथार्थपणे जाणून घ्यावयाचे असेल तर साधकाला साधनेतून प्रचितीच घ्यावयास हवी. प्रचितीशिवाय जीवन एकांगी, अशक्त, अतृप्त असेच होते. साधनमार्ग आचरण्यासाठी यम, नियमादि गोष्टींचा विचार करावाच लागतो. नीतिनियम हे आपल्याच उत्कर्षासाठी, कल्याणासाठी असतात म्हणून त्यांचे पालन करणे इष्ट ठरते. विश्वातील सर्व संतांनी, अधिकारी पुरुषांनी, महात्म्यांनी आपला उत्कर्ष साधनमाध्यमातूनच करून घेतला आहे. साधना वेगवेगळ्या असतील पण उद्दिष्ट अथवा ध्येय एकच असते. सर्वोत्तम ध्येय म्हणजे परमात्मा प्राप्ती होय. या ध्येयाची प्राप्ती होण्यासाठी अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागते. मनोव्यापारांना सामोरे जावे लागते. आपल्यातच आपण बदल घडवून आणावयास लागतो. साधक हा पराक्रमी हवा तसाच निश्चयी हवा. नेम, निश्चय व ध्येयासक्ती या तीनही गोष्टी साधकाने आपल्या हृदयात संपुटित करून ठेवावयास हव्यात. या गोष्टींमुळे साधकाला आतून प्रगत होण्यास मदत होते. तत्त्वज्ञानाच्या फार आहारी जाऊ नये. मोठमोठ्या पुरुषांची वचने, त्यांच्या प्रचिती, त्यांचे जीवन याविषयी उगाच ऊहापोह करीत बसण्यापेक्षा प्राप्त परिस्थितीत आपलेच आपण व्यवस्थापन करीत राहावे. महापुरुषांची जीवनचरित्रे, ती चरित्रे घडवत असताना त्यांनी केलेले प्रयास स्फूर्तिप्रद होतात हे खरे आहे. पण कितीही मोठा मनुष्य असला तरी त्याच्या आयुष्याला त्याने लावलेले वळण हे या ना त्या

प्रकारे कायिक, मानसिक कष्टातूनच तसेच अभ्यासयोगातून लावलेले असते याची जाण साधकाने ठेवावयास हवी. जगात देव मानणारे लोकही अनेक आहेत तसेच देव न मानणारेही अनेक आहेत. जगातील विविधता, विरोधाभास, जीवनप्रवाहांचे वैविध्य या गोष्टी पुष्कळ वेळा सतावतात व सुखावतातही. सुखदु:खांच्या विविध संवेदना प्रचितीला येतात. शरीर पंचमहाभूतांचे बनलेले आहे. बाहेरील वादळवाऱ्यांपेक्षा आतील वादळवारा साधकाचा अनेक वेळा मनोभंग करतो. आनंदात दंग होण्याची इच्छा असूनही तो मिळतोच असे नाही. प्रत्येक देहाबरोबर न दिसणारे पण कार्यरत असणारे दैव ठाण मांडून बसलेलेच असते. यशस्वी लोक आम्ही दैववादी नाही असे म्हणतात. आम्ही कष्ट केले म्हणून आम्हाला प्राप्ती झाली. या ना त्या प्रकारे लोक आपापले विचार व्यक्तवतात. आपली जीवनधारा बळकट करण्यासाठी प्रयत्नशील होतात. जीवाला माहीत नसते की आपणास येथे किती दिवस राहावयाचे आहे. तो बेचैनीत चैन शोधण्याचा प्रयत्न करतो. रूढी, परंपरा, जगद्व्यवहार यात अडकत जातो. मनाला हवे ते मिळतेच असे नाही. नाही मिळाले की चित्त हिंपूटी होते. जग हे तुलनेने भरलेले आहे. आपपरभावाच्या कात्रीत जीव सापडतो. कधी राग, कधी द्वेष तर कधी ईर्षा या गोष्टींनीही तो घामाघूम होतो. या जगात वस्तूंच्या प्राप्तीसाठी पैसा हे महत्त्वाचे माध्यम मानले जाते पण माध्यम म्हणजेच सर्वस्व असे मानून प्रवास होतो. हार व प्रहार चालूच असतात. 'देव देवस्कीच्या नादाला अनेक लोक लागलेले आहेत, लागणार आहेत व लागत राहतील.' संतांनी उद्घोषित केलेला आनंदाचा मार्ग हा सुद्धा बहुचर्चित विषय होतो. त्यात अडाणी, विद्वान सगळेच भाग घेतात. आपणाला काही मिळाले आहे का ? असे विचारल्यास मुळूमुळू उत्तरे देतात. उत्तरात दम नसतो. जगण्यात राम नसतो. अशी सगळी परिस्थिती असताना साधकाचा मतिभ्रम होऊन त्यास वाटत असते की शांती कुठे मिळेल ? संतांतील गर्भश्रीमंत संत 'ज्ञानेश्वर माउली !' त्यांना माउली असे म्हणतात. याचे कारण तिची सावली न संपणारी आहे. त्या सावलीत होणारी वाढही सर्वंकष आहे. माउलीच्या सावलीत तहानभूक हरपते. पण या सावलीचा आपणास आधार आहे व तो आपण घ्यावा असे वाटावयास भाग्य लागते, मार्गदर्शन

लागते. मार्गदर्शन करणारेही भेटतातच असे नाही. विश्वामध्ये विविध विचारप्रवाह कार्यरत असतात. त्यात संतांनी देशाला दुबळे बनवले हा विचारही आहे. लौकिक यशातून कुठंतरी आत असंतुलित होऊन मांडलेला हा विचार शंभर टक्के ग्राह्य मानावयाचे कारण नाही. मांडलेला विचार स्वीकारायलाच हवा असेही नाही. साधकाला हवे असलेले आत्मधन त्याच्या अंतरंगातच असते अशी प्रचिती पृथ्वीच्या सर्व खंड, उपखंडातील महात्म्यांनी मांडली आहे. ज्ञानेश्वर माउलींनी ठामपणे असे सांगितले, 'तैसे अध्यात्मशास्त्री इये। अंतरंगचि अनुभविये।'

म्हणून अध्यात्मशास्त्रात आतला रंग गडद व्हावयास हवा. हा रंग आत गडद झाल्यावर साधक भगवंतातच दंग होतो. ईश्वराचे आणि त्याचे असे नाते जडते की मोक्षालाही तो बाजूला हो म्हणतो. या आनंदाचे माध्यम मात्र पैसा नाही. त्याचे माध्यम हृदय आहे. 'हृदयाकाश' हा शब्द वारंवार वापरला जातो. त्याचा अर्थ साधकाने असा घ्यावा की, हृदय आकाशाएवढे झाले की जगाची किंमत वाटेनाशी होते, जग लहान वाटते. साधकाने आपल्या जीवनाची जडणघडण करत असताना विवेकाचा वापर मोठ्या कौशल्याने करावयास हवा. विवेक त्याला मृगजळापासून दूर ठेवतो. त्याला नेमस्त करतो. उपासनेचा आश्रय प्रत्ययकारी होण्यासाठी नियमितपणे उपासना करावयास हवी. उपासनेत अनेक व्यत्यय येतात. आले तरी घाबरावयाचे कारण नाही. उपासनेला मनाचा पाठिंबा लागतो. मन हे चंचल आहे आणि इंद्रिये प्रमाथी आहेत असे अध्यात्मशास्त्रकारांचे म्हणणे आहे. अधिकारी पुरुषांचे म्हणणे यथार्थपणे कळण्यासाठीही उपासनाच हवी. म्हणून समर्थ म्हणतात, उपासनेचा सत्य आश्रयो ! आश्रय असा हवा की त्याने भीतीचे कंबरडे मोडावे. भव भयाचा नाश करण्यासाठी उपासना उपयोगी पडते. संतांच्या जवळ लौकिकातील विपुल गोष्टी होत्याच असे नाही पण ज्याच्याजवळ अक्षय विपुलता आहे असा भगवंत त्यांच्याजवळ होता. 'वैभव' या शब्दाचा अर्थच मी असा करतो की, 'वैकुंठवासी भव।' या लोकात राहा व वैकुंठाची प्रचिती घे असा याचा अर्थ आहे.

इहलोकी राहावे परलोकी पाहावे। या संतवचनाचा आशय आत्मानुभूतीतून जीवन व्यतीत करावे असाच आहे. वाङ्मयाची निर्मिती

आत्मसत्तेतूनच होत असते. वाङ्मयाचा बरेवाईटपणा हा त्यातून जे विचार व्यक्त होतात त्यावरूनच ठरवला जातो. आत्मसत्तेच्या यथार्थ जाणिवेतून निर्माण झालेले वाङ्मय चिरंतन ठरते तर मायेच्या अमलाखाली कार्यरत असलेले त्रिगुण सत्त्व, रज, तम हे ज्या प्रमाणात कार्यरत असतात त्यानुसार मायोद्भव जे वाङ्मय निर्माण होते त्याचा निकष जाणकार लोक ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे लावत असतात. येथे मुद्दाम वाङ्मयाचा विचार केला आहे. या विचारामागील हेतू असा आहे की, संतांनी जी अक्षरनिर्मिती केली त्या अक्षरांविषयी जर चिंतनशील राहता आले व उपासना चालू ठेवली तर ती चिंतनशीलता अधिक प्रगल्भ होत जाऊन त्यातून निजबोध झाल्याशिवाय राहात नाही. या अनुभूतीच्या भागातूनच पारायण, सप्ताह या पद्धती अस्तित्वात आल्या. हे पुस्तक साधना करणाऱ्यांच्यासाठी आहे. साधनेमध्ये बऱ्याचशा अडचणी निर्माण होतात. भांबावल्यासारखे होते. विचारांच्या देवाणघेवाणीतून नेमकेपणा निर्माण होण्याऐवजी विचार × विचार असाच काहीसा प्रकार सुरू होतो. या पुस्तकात मूलभूत अद्वितीय सिद्धांत मांडले नाहीत. ते मांडण्याची गरजही वाटली नाही. सोप्यातला सोपा परमार्थ अवघड करण्याची इच्छा झाली नाही. निखळ मनाने, प्रेमभावातून साधना करावयास सुरुवात झाल्यावर उपासना प्रांतातील गहनातील गहन प्रमेये आपोआपच प्रचितीला येतात व मनाला समाधान लाभते. हे समाधान म्हणजे केवळ आळशीपणातून झालेली निर्मिती नसून त्यास परमार्थ विज्ञानाचा आधार आहे. ढळढळीत आत्मज्ञान झाल्यावर त्याची तर्कशुद्ध मांडणी जेव्हा होते तेव्हा त्यास विज्ञान असे म्हणतात. समर्थ, ज्ञानदेव, तुकारामादी संतांनी विकारांचा अडसर दूर करून समाधानाची प्राप्ती कशी करून घ्यावी याविषयी विपुल लेखन केले आहे. ते लेखन करण्यामागे *'बुडती हे जन। न पाहवे डोळा।'* हा त्यांचा हेतू होता. या त्यांच्या हेतूला सहजकारुण्य भाव असे म्हणतात. स्वत:चे शहाणपण प्रकट करण्यासाठी त्यांनी अक्षरवाङ्मयाची निर्मिती केली नाही तर जीवनामध्ये अमृतानुभव घेऊन तो अमृतानुभव आत ओतप्रोत झाल्यावर त्यांची आत्मबुद्धी व स्फूर्ती आपोआपच कार्यरत झाली. परमात्म्याचे संविधान मोठे मनोरंजक तसेच परमहितकारी असते याची जाणीव

संतवाङ्‌मयाच्या अभ्यासातून झाल्याशिवाय राहात नाही. संतांच्या वाङ्‌मयाचे अभ्यासक त्यांच्या वाङ्‌मयातील त्रुटीही दर्शवितात. प्रवास म्हणल्यावर कमीजास्त काहीसे होत असते. संतांचे संतत्व सिद्ध होईपर्यंत तो सर्वसामान्य माणसासारखाच असतो. त्याची स्वत:ची प्रचिती तो व्यक्तवत असताना कमीजास्तपणा असणारच. आत्मविद् झालेला संत आपले बाहू उभारून जेव्हा हरिनामाचा जल्लोष करतो व त्यातून त्यास जो आनंद प्राप्त होतो, त्या आनंदाने केवळ तो संत हरखून जात नाही तर त्याचा जेथे वावर असतो तेथील आसमंतसुद्धा ईश्वराची तरलभावस्पंदने पिऊ लागतो. जेव्हा असा आनंद संतसहवासातील व्यक्ती लुटतात तेव्हा खरोखरीच त्यांना असे वाटत राहते की, मोक्षही आपल्या पायाशी आला आहे. मुक्तीने द्वेष करावा अशी ही स्थिती आहे. पुष्कळ विद्वान लोकांचे म्हणणे असे आहे की, धर्म ही अफूची गोळी आहे. मग क्षणोक्षणी जोडे मारणारा व्यवहार काय गांजा आहे काय ? माझ्या वयोमानानुसार कोणत्याही संघर्षाचा पवित्रा घेणे उचित नाही व मी इच्छितही नाही. इच्छित अशाचसाठी नाही की, ज्या गावास आपणाला जायचे नाही त्या गावाची अकारण माहिती घेण्यात तथ्य नाही असे आमचे ठाम मत आहे. साधनप्रांताचा विचार केला तर असे आढळून येईल की, हा प्रांत अस्तित्वात आला म्हणून जगामध्ये, जीवनामध्ये कोठेतरी माणूस संतुलित राहतो. या संतुलनातून त्याला विपरीत परिस्थितीतही सावरण्याची शक्ती मिळते. 'ग्यानबा तुकाराम' या नावाने सर्व दिशांचे बंधन केल्यामुळे संतांनी देह ठेवले तरी कोट्यवधी लोकांत संतभाव स्फुरण होऊन ते संत अनेक देहांतून प्रबोधन करत राहतात, सुखावत राहतात. 'साधकाचा प्रवास' असे या पुस्तकाचे शीर्षक आहे. खरे पाहता साधनेच्या प्रांतात प्रवास या शब्दाचा अर्थ देहाची हालचाल असा नाही. प्रकर्षाने जेथे वास्तव्य करावयाचे त्यास प्रवास असे म्हणतात असे आमचे मत आहे. आमच्या मताशी जगाने सहमत व्हावे अशी आमची मुळीच इच्छा नाही. इच्छा असेल तर घ्या, नाहीतर पटत नाही म्हणून सोडून द्या. या पुस्तकाचा गाभा भरतवर्षाच्या समृद्ध इतिहासात वारंवार भावधारणेसाठी ज्या लोकांनी साधनमार्गाची जोपासना केली व मुख्यत्वेकरून या मार्गाच्या जपणुकीसाठी उपासना